॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**

जळगाव दि. 10 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार शनिवार दिनांक 11 ऑगस्ट पासून "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव" असा अंमलात येत आहे. या नामविस्तारानिमित्त आनंद सोहळा मात्र मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्यांच्या उपलब्धतेनुसार लवकरच घेतला जाणार आहे.

जुलै महिन्यात नागपूर येथे झालेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव" असा नामविस्तार करण्याचे विधेयक एकमताने मंजूर झाले होते. 11 ऑगस्ट रोजी हा नामविस्तार करण्याची घोषणा शिक्षणमंत्री श्री.विनोद तावडे यांनी अधिवेशनाच्या काळात केली होती. विद्यापीठाला शुक्रवारी नामविस्ताराची अधिसूचना प्राप्त झाली असून त्यानुसार शनिवार दिनांक 11 ऑगस्ट पासून "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव" असा नामविस्तार करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार शनिवार पासून नामविस्तार अंमलात येणार आहे. मात्र या नामविस्ताराचा आनंद सोहळा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपलब्ध तारखेनुसार लवकरच घेतला जाणार असल्याची माहिती कुलसचिव श्री.भ.भा.पाटील यांनी दिली.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. १० ऑगस्ट, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

North Maharashtra University, Jalgaon

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १० ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २७ व्या पदवीप्रदान समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी / पदविका प्रमाणपपत्र घ्यावयाचे आहेत त्यांना दि.३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत.

विद्यापीठातर्फे मार्च/एप्रिल/मे, २०१८ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home page वरील **Student Corner →Examination→Convocation** वर उपलब्ध आहेत. विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत ३० सप्टेंबर, २०१८ असून दि. ०१ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर, २०१८ या दरम्यान विलंब शुल्कासह अर्ज भरता येतील. नियमित पदवीप्रमाणपत्र शुल्क रु.३५०/- आहे. उत्तीर्ण वर्षापासून ५ वर्षा पेक्षा जास्त कालावधी झाले असल्यास रु.१०००/- शुल्क भरावे लागेल. विलंब शुल्क रु.१००/- आहे. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बँकींग द्वारे ऑनलाईन भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ.ए.बी.चौधरी यांनी केले आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.९ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जाहिर करण्यात आले आहेत.

महाविद्यालयांमध्ये जळगाव जिल्हयातून चोपडाच्या एम.जी.एस.एम.एस.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला रासेयो एकक उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जाहिर झाला आहे. तर नंदुरबार जिल्हयातून सार्वजनिक कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विसरवाडीला पुरस्कार जाहिर झाला आहे. उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारीचा पुरस्कार जळगाव जिल्हयातून डॉ.रमाकांत महादु बागुल (एम.जी.एस.एम.एस.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा) यांना तर नंदूरबार जिल्ह्यातून डॉ.विशाल शिवाजीराव करपे (सार्वजनिक कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विसरवाडी ) यांना पुरस्कार जाहिर झाले आहेत. विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जळगाव जिल्हा कुणाल अर्जुन मानकर (धनाजी नाना चौधरी महाविद्यालय, फैजपूर), धुळे जिल्हा कल्पेश विजय बोरसे (विद्यावर्धिनी सभेचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे) तर नंदूरबार जिल्हा कु.वैशाली राजेंद्र पाटील (ट्रायबल एज्युकेशन सोसायटीचे, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदूरबार) यांना हे पुरस्कार जाहिर झाले आहेत. या पुरस्काराचे वितरण कार्यक्रम यथावकाश जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिली.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 10 ऑगस्ट, 2018

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात जळगाव, धुळे व नंदुरबार आवृतीत प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी